# महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर

आयोजित

संविधान दिनानिमित्त

राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

विषय - भारतीय संविधानासमोरील आव्हाने व उपाय (खुला गट)


स्पर्धक - वैभव अनिल अलई

पत्ता - मू. पो. लोहोणेर, ता. देवळा,
जि. नाशिक, पिन - ४२३३०१

संपर्क क्र - ९३०९१३३३८४
७७६८०६१६९३

Email - vaibhavalai.auto@gmail.com

# भारतीय संविधानासमोरील आव्हाने व उपाय

पुढील वर्षी १५ ऑगस्ट रोजी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण होतील. त्या अनुषंगाने आपण हा काळ 'अमृत महोत्सव' म्हणून साजरा करीत आहोत. त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. आणि ते स्वाभाविकही आहे. कारण सुमारे दीडशे वर्षांचे पारतंत्र्य आणि त्यातून मुक्तते-साठीचा व्यापक संघर्ष आपण सगळेजण जाणून आहोत. पण आज स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या आणि संविधानाच्या ७२ वर्षांच्या इतिहासाकडे मागे वळून बघताना आपल्यासमोर एक प्रश्न सहज उपस्थित होतो तो म्हणजे, दिनांक १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संवैधानिक मूल्यांच्या विश्वासावर "नियतीशी" केलेला मानवी कल्याणाचा करार आपण पूर्णत्वास नेला आहे का?

भारताचा इतिहास एका बाजूने गौरवशाली आणि अभिमान-संपन्न असला तरी दुसऱ्या बाजूला विषमतेने डागाळलेला आहे. लिंग, वर्ग, जात यावर आधारित विषमता कधी भारतीय समाजव्यवस्थेचा भाग झाली हे भारतीय इतिहासाच्याही लक्षात आले नाही. देशाचा स्वातंत्र्यलढा चालू असतानाच या विषमतेच्या विरोधात समांतरपणे सामाजिक लढाही सुरु होता. स्वातंत्र्य मिळाल्यावर त्या लढ्याला मूर्त रूप देण्यासाठी भारतीय संविधानात राजकीय हक्कांबरोबरच अनेक सामाजिक हक्कांच्या तरतुदीही करण्यात आल्या. या सामाजिक तरतुदींच्या माध्यमातून लिंग, जात, धर्म, वंश, भाषा, प्रांत यापलीकडे जाऊन संपूर्ण भारतीय समाजाला एकसंध करण्याचे अतिशय नाजुक काम गेल्या ७२ वर्षांत संविधानाने केले आहे. म्हणून विविधतेने नटलेला आपला भारतीय समाज भविष्यातही एकसंध टिकवून ठेवण्यासाठी संविधान आणि त्यातील उदार मूल्ये टिकणे गरजेचे आहे. नाहीतर संविधानाला किंवा संवैधानिक मूल्यांना एका मर्यादेबाहेर धोका पोहचल्यास इतिहासाची चाके पुन्हा उलटी फिरायला वेळ लागणार नाही.

भारतीय संविधानाची निर्मिती करण्यासाठी कॅबिनेट मिशनच्या सूचनेप्रमाणे १९४६ साली संविधानसभेची स्थापना करण्यात आली. संविधानसभेत देशाच्या विविध प्रांतातून अनेक जातीधर्मांचे, राजकीय पक्षांचे आणि विचारसरणीचे सदस्य सहभागी झाले होते. डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते. मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जवळपास साठ देशांच्या संविधानांचा अभ्यास करुन भारतीय सांस्कृतिक राजकीय आणि भौगोलिक परिस्थितीला अनुरुप असा संविधानाचा मसुदा तयार केला. २ वर्ष, ११ महिने आणि १८ दिवसांच्या अथक परिश्रमानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानसभेने संविधानाच्या अंतिम मसुद्याला मान्यता दिली. २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु होऊन प्रजासत्ताक भारताची आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीची स्थापना झाली.

भारतीय संविधान हे फक्त एक कायदी पुस्तक नसून सनदशीर मार्गाने क्रांती घडवून आणणारे महत्वाचे दस्तऐवज आहे. भारतीय नागरिकांना त्यांच्या अधिकार आणि कर्तव्यांची जाणिव करुन देणारा नागरिक आणि राज्यव्यवस्था यातील तो लिखित करार आहे. संविधानाची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून आज सात दशकांनंतर संवैधानिक तरतुदी व त्यात समाविष्ट असलेल्या मूल्यांना अनुसरुन आपल्या राजकीय व्यवस्थेच्या वाटचालीचे निष्पक्षपणे मूल्यमापन केल्यास याबाबत सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू समोर येतात. मात्र जेव्हा जेव्हा या मूल्यमापणाची नकारार्थी बाजू समोर येते तेव्हा संविधान व संवैधानिक मूल्ये यांना इतिहासात असो वा वर्तमानात दिल्या गेलेल्या आव्हानांची, त्याच्या कारणांची आणि त्यावरील उपायांची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते.

मानव हा सामाजिक तसेच राजकीय प्राणी आहे. एखाद्या व्यक्तीला समाजात काही अधिकार मिळाले की त्या अधिकारांच्या पाठोपाठ काही अवाजवी अपेक्षाही निर्माण होणे हा मानवी समाजाचा नैसर्गिक गुण आहे. जेव्हा हे अधिकार राजकीय सत्तेपासून मिळतात तेव्हा या अवाजवी

अपेक्षा निर्माण होण्याची शक्यता अधिकच असते. याबाबत थोर ग्रीक विचारवंत प्लेटो आणि अरिस्टोटल यांनी अधिक विस्तृत मांडणी केली आहे. भारतीय राजसत्तेच्या अधिकारपदावर बसलेल्या व्यक्तींच्या या अवाजवी अपेक्षांतूनच "संविधानाने नागरिकांना दिलेल्या वचनांची पूर्तता न झाल्याने आणि संवैधानिक मूल्यांची हानी होत गेल्याने" संविधानासमोर काही आव्हाने इतिहासात निर्माण झाली आहेत, वर्तमानातही होत आहेत आणि भविष्यातही होत राहतील.

## भारतीय संविधानासमोरील आव्हाने

भारतीय संविधानासमोरील आजचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे संवैधानिक साक्षरतेचा अभाव. देशातील बहुसंख्य लोकांना संविधान व त्यामागील भावनाच माहीत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एका विशिष्ट वर्गासाठीच संविधान लिहिले आहे असा अत्यंत चुकीचा समज आजही आपल्या बहुतांश समाजात आहे. त्यामुळे देशातील असंख्य सामान्य लोक संविधानातील तरतुदींपासून आणि त्यापासून मिळणाऱ्या अधिकारांपासून अपरिचीत आहेत. जर आपले अधिकार आणि कर्तव्यच माहीत नसतील तर त्यांची अंमलबजावणी होणार कशी ?

लोकशाही प्रणालीत संविधानाचे भवितव्य त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांच्या बुध्दी, ज्ञान आणि चारित्र्य या तीन गुणांच्या अधिष्ठानावर अवलंबून असते. मात्र निवडणुकीच्या वेळी उमेदवारांनी मतदारांना विकत घेण्याचा पायंडा रुढ झाल्यामुळे हा विचार मागे पडला. आजही निवडणुकीतील आपल्या मतदारांचे वर्तन उमेदवाराच्या कर्तृत्वापेक्षा जातीय भावनेवर आधारित असलेले दिसून येते. हे चित्र निकोप लोकशाही आणि संविधानासाठी निश्चितच योग्य नाही. व्यक्तीकेंद्रित झालेली निवडणूक प्रक्रिया, राजकारणातील वाढते गुन्हेगारीकरण, मतदानाचे अल्प प्रमाण, निवडणुकीतील पैशांचा वापर या निवडणूक प्रक्रियेतील महत्वपूर्ण त्रुटी आहेत. म्हणून मूल्याधारीत होण्यापेक्षा भावनाधारीत झालेली निवडणूक प्रक्रिया हे संविधान लागू

झाल्यापासूनचे संविधानाच्या लोकशाही मूल्यासमोरील आव्हान आजही कायम आहे.

संसद, विधानमंडळे हे जनतेच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी सर्वोच्च सभागृहे आहेत. मात्र सभागृहातील सदस्यांकडून सामान्य जनतेच्या प्रश्नांपेक्षा पक्षीय विचारसरणीला अधिक महत्व दिले जाते. एकीकडे अधिवेशनांचा सरासरी कालावधी वर्षानुवर्ष कमी होत असतानाच सदस्यांच्या उदासीनतेमुळे हा वेळही बहुंताशवेळा चर्चा न होताच वाया जातो. काही आठवडे किंवा महिन्यांची चर्चा आवश्यक असणारी विधेयके काही तासांच्या चर्चेने मंजूर होतात. लोकांनी सरकारला निवडणुकीच्या माध्यमातून पाच वर्षांसाठी सत्ता दिली असली तरी ती निरंकुश नाही. कोणताही निर्णय घेताना त्या त्या वेळी आवश्यक भागधारकांची मते जाणून घेण्याचा मोठेपणा शासनाने दाखवायला हवा. नाहीतर सामान्य जनतेत सरकारच्या निर्णयावर शंका निर्माण होऊ लागते. मागील वर्षी मंजूर झालेले आणि चालू अधिवेशनात मागे घ्यावे लागलेले तीन कृषी कायदे याचे ज्वलंत उदाहरण आहे. हे कायदे योग्य आणि गरजेचे असतीलही मात्र ते मंजूर करण्याचा मार्ग नक्कीच योग्य नव्हता. त्यामुळे संसदीय परंपरांचे होणारे हनन हे भारतीय संविधानासमोरील मोठे आव्हान आहे.

सर्वोच्च न्यायालय ही संविधानाचा अन्वयार्थ लावणारी आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणारी सर्वोच्च संस्था आहे. केशवानंद भारती वि. केरळ राज्य (१९७३), इंदिरा गांधी वि. राजनारायण (१९७५), मेनका गांधी वि. भारतीय संघराज्य (१९७८) इ. प्रकरणांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाने संविधानाला अधिक उदार चौकट प्रदान केली आहे. सध्या चर्चेत असणाऱ्या खाजगीपणाचा अधिकार, पेग्यासिस, भारतीय दंड संहितेचे कलम ४९८ आणि ३७७ निरस्त करणे या प्रकरणातही सर्वोच्च न्यायालयाने बदलत्या कालानुसार संवैधानिक मूल्यांचे नवीन अर्थ काढत सामान्य जनतेच्या अधिकारांची तळी उचलून धरली. जनहित याचिकांच्या माध्यमातून सामान्य जनतेची न्यायव्यवस्थेतील पोहोच अतिशय सोपी झाली आहे. मात्र तरीही

न्याय मिळण्यात होणारा विलंब हा एक प्रकारे अन्यायच आहे. यामुळे सामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होण्याची शक्यता असते. आज भारतीय न्यायव्यवस्थेत न्यायाधीशांच्या एकूण जागांपैकी ६०१७ जागा रिक्त असून ४.५ कोटीहून अधिक खटले प्रलंबित आहेत.

| क्र. | न्यायपालिका | प्रलंबित खटले | एकूण जागा | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ न्यायालये | ४,१०,५६,७९४ | २२,६७७ | ५९८४ |
| २ | उच्च न्यायालये | ५६,४३,२५२ | १०८९ | ३९२ |
| ३ | सर्वोच्च न्यायालये | ७००३८ | ३४ | १ |

कनिष्ठ न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय असा प्रवास करत कोणत्याही खटल्याला अंतिम रूप मिळण्यात काही दशकांचा वेळ वाया जातो. न्यायव्यवस्थेत होणारा फक्त इंग्रजी भाषेचा वापर सामान्य व्यक्ती आणि न्यायव्यवस्था यात विशिष्ट अंतर बनवून ठेवतो. वेगवेगळ्या जातपंचायतींकडून दिले जाणारे अलौकिक आणि अवैज्ञानिक फतवे समांतर न्यायव्यवस्थेची निर्मिती करतात. विकास दुबे, हैद्राबाद बलात्कार प्रकरण यांसारख्या घटनांमध्ये "एन्काऊंटर" करुन झटपट न्याय देण्याची जी पद्धत विकसीत झाली आहे त्यातून थेट न्यायव्यवस्थेच्या अस्तित्वावरच निर्माण झालेले प्रश्नचिन्ह गंभीर आहे. या सर्वांवर उपाय शोधणे ही काळाची गरज आहे.

आपल्या समाजात आजही महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक, तृतीयपंथी इ. वंचित घटकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना बघावयास मिळतात. या वंचित घटकांचे समाजात अजूनही पूर्ण समावेशन झालेले नाही. भारतामध्ये सर्वत्र आढळणाऱ्या या वंचिततेला अनेक आयाम आहेत. महिलांच्या बाबतीत तर ते अधिक प्रकर्षाने जाणवतात. महिलांचे संसदेतील, न्यायव्यवस्थेतील, सार्वजनिक नोकरीतील अत्यल्प प्रतिनिधित्व याला प्रमाण आहे. शबरीमालासह काही प्रतिबंधित मंदिरांमध्ये हिंदू महिलांना प्रवेश असावा की नाही, मशिदीत मुस्लिम महिलांना प्रवेश असावा की नाही, पारशी महिलांना बिगर पारशी पुरुषाशी विवाहाचा अधिकार असावा की नाही, बोहरा समाजातील महिलांचे जनेंद्रिय

विच्छेदन हे प्रश्न स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असणे म्हणजे संविधानाच्या समानतेच्या तत्वाचे थेट उल्लंघन आहे. जागतिक आर्थिक मंचाने (WORLD ECONOMIC FORUM) २०२१ वर्षासाठी घोषित केलेल्या 'ग्लोबल जेंडर इंडेक्स' मध्ये १५६ देशात भारताचा क्रमांक १४० आहे. या निर्देशांकात अगदी तळाला सापडणारा भारत देश तसेच खालील माहितीवरुन भारतीय महिलांची विदारक स्थिती आपल्या लक्षात येऊ शकते.

| | |
|---|---|
| महिलांचा लोकसभेतील वाटा | १४% (५४३ पैकी ७८ जागा) |
| महिलांचा न्यायव्यवस्थेतील वाटा | सर्वोच्च न्या. - १२% (३३ पैकी ४)<br>उच्च न्या. - ८% (१११३ पैकी ८०) |
| महिलांचा नोकरीतील वाटा | २३% |
| सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे सामाजिक समीकरण | एकूण ३४ (SC-02, ST-0, OBC-1, महिला - ४, मुस्लिम - १) |
| लोकसभेत सर्वसाधारण जागेवर निवडून आलेले SC/ST उमेदवार | SC - 2 (एकूण खा. ८६ पैकी आरक्षित जागा - ८४)<br>ST - 4 (एकूण खा. 52 पैकी आरक्षित जागा - ४७) |

दलित, आदिवासी यांसारख्या वंचित घटकांची आरक्षणाचा अपवाद वगळता हीच स्थिती आहे हेही वरील आकड्यांवरुन लगेच लक्षात येते. मंडल आयोग लागू झाल्यानंतर इतर मागासवर्गीयांचे समावेशन वाढले असले तरी जातीनिहाय जनगणनेच्या अभावी त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. वर्तमानातीलच याचे उदाहरण म्हणजे, योग्य संख्यात्मक माहिती नसल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थातील इतर मागासवर्गीयांचे संपूर्ण आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आहे. सर्वसमावेशक समाजाशिवाय भारताची सर्वांगीण प्रगती शक्य नाही. त्यामुळे संविधानातील समानतेच्या तत्वाला बगल देणारे सर्वसमावेशकतेचा अभाव हे आव्हान इतिहासाच्या मानाने आज काही प्रमाणात कमी झाले असले तरी नवीन आयाम धारण करताना नक्कीच दिसून येते.

मागील काही काळात प्रदर्शित झालेल्या जय भीम, आर्टिकल फिफ्टीन, कर्णन, आरक्षण इ. चित्रपटांच्या माध्यमातून संविधानाने हमी दिलेल्या

व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे भीषण वास्तव समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारताचा जागतिक आनंद निर्देशांकात (GLOBAL HAPPINESS INDEX) १४९ देशात असणारा १३९ वा क्रमांक, जागतिक उपासमार निर्देशांकात (GLOBAL HUNGER INDEX) ११६ देशात असणारा १०१ वा क्रमांक, जागतिक शांतता निर्देशांकात (GLOBAL PEACE INDEX) १७० देशात असणारा १३५ वा क्रमांक देशातील सामान्य नागरिकांची संविधानाने कलम २१ अंतर्गत दिलेल्या सन्मानपूर्वक जीवन जगण्याच्या अधिकाराबाबत होत असलेली थट्टा लक्षात आणून देतात. जगातील सर्वाधिक आत्महत्या भारतात होतात. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्थेच्या (NATIONAL CRIME RECORD BUREAU) अहवालानुसार अनुसूचीत जातीजमाती, महिला यांच्यावरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. देशात आजही मानवतेला कालिमा फासणाऱ्या हाताने भंगीकाम, सेप्टिक टँक मध्ये गुदमरून मृत्यूमुखी पडणे, झुंडशाही (MOB LYNCHING), कुपोषण, कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार यांसारख्या घटना पाहायला मिळतात. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही देशातील २२%. जनता दारिद्र्यरेषेखाली असणे, देशातील अर्ध्याहून अधिक जनतेचे स्वस्त धान्य दुकानाच्या रांगेत उभे असणे, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत ऑक्सिजन अभावी लाखो भारतीयांचा तडफडून मृत्यू होणे या घटना संविधानातील कल्याणकारी राज्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा ही वचने प्रत्यक्षात किती अस्तित्वात आली याबाबत शंका उपस्थित करतात.

देशातील वाढता जातीयवाद, सांप्रदायिकता आणि प्रादेशिकवाद राष्ट्रीय एकात्मता या संवैधानिक मूल्याला धोका बनू पाहत आहेत. जम्मू-काश्मिर, पंजाब आणि ईशान्येतील आसाम, नागालँड, मिझोरम या राज्यांच्या बाबतीत काही विघातक शक्तींनी फुटीरतावादाला घातलेले खतपाणी आपण अनुभवलेले आहे. संविधानाच्या चौकटीत



बंदिस्त असलेल्या स्वतंत्र भारताने सातत्याने प्रयत्न करुन दहशतवाद, आतंकवाद, धर्मवाद, प्रांतवाद, क्षेत्रवाद, भाषावादाला नष्ट वा किमान नगण्य तरी करायला हवे होते. मात्र मतांच्या राजकारणासह इतर काही कारणांमुळे लोकांचे या वादांकडे आकर्षित होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे समाजात परिवर्तनासाठी फार मोठ्या सामाजिक प्रबोधनाची गरज आहे.

संविधानासमोरील आव्हानांची मालिका येथेच संपत नाही. नीतिमान नेतृत्वाच्या उभारणीची समस्या, वाढता भ्रष्टाचार, वाढते गुन्हेगारीकरण, रोजगाराचा अभाव, अत्यंतिक राष्ट्रवाद, संघराज्यीय प्रणालीला वाढता धोका, पाश्चिमात्य विचारसरणीचा वाढता प्रभाव, सामाजिक मूल्यसंस्कार देणाऱ्या शिक्षणव्यवस्थेची कमतरता, लोकांची बदलती मानसिकता पूर्ववत आणून संविधानावरील विश्वास टिकवून ठेवणे, बहुसंख्यांक वि. अल्पसंख्यांक वाद, शासन व्यवस्थेच्या चारही स्तंभांची स्वायत्तता-स्वतंत्रता-सुसूत्रता, माध्यमांवरील वाढता दबाव, 'पेड आणि फेक न्यूज' यांचे वाढते प्रमाण, अनेक प्रकरणांमध्ये माध्यमे निभावत असलेली न्यायव्यवस्थेची भूमिका (MEDIA TRIAL), अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी, समांतर अर्थव्यवस्था आणि त्यातून तयार होणारी समांतर राजव्यवस्था, राष्ट्रद्रोह कायद्याचा (IPC Article No-124 & UAPA Act) होणारा गैरवापर अशी अनेक पुष्पे या शृंखलेत जोडली जाऊ शकतात.

## उपाय

अगदी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणातील सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात संविधानाचा समावेश व्हायला हवा. कारण संविधान हा फक्त ज्ञानाचा विषय नसून सन्मानपूर्वक जगण्याचा मार्ग आहे. समाजकल्याण विषयक संसदीय समितीने काही वर्षांपूर्वी केलेल्या, " संवैधानिक मूल्यांचा प्रचार प्रसार करण्यासाठी वेगळ्या यंत्रणेची निर्मिती करावी" या सूचनेची अंमलबजावणी होणेही आवश्यक आहे. तसेच समाजाच्या इतर घटकांमध्ये संविधानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी सामाजिक संघटनांनीही पुढाकार घ्यायला हवा.

४ दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगासह (SECOND ADMINISTRATIVE REFORM COMMISSION - 2005) दिनेश गोस्वामी समिती सारख्या इतर काही महत्वाच्या निवडणूक सुधारणा समित्यांनी सुचविलेल्या "निवडणूक लढविण्यासाठी किमान शिक्षण ही पूर्वअट ठेवणे, राजकारणाच्या माध्यमातून सत्तेतील पद उपभोगण्यास निवृत्ती वय ठरवणे, गंभीर गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप असणाऱ्या किंवा सिध्द झालेल्या उमेदवाराला निवडणूक लढवण्यास बंदी घालणे, वन नेशन वन इलेक्शन, स्टेट फंडेड इलेक्शन" यासारख्या उपायातून निवडणूक प्रक्रियेतील त्रुटी नक्कीच कमी होऊ शकतात.

कायदेमंडळांचे अधिवेशन चालू असताना "एकमेका कोंडीत धरू" या पध्दतीने काम न करता सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोघांनीही सामंजस्यपणा दाखवत वेळेचा सदुपयोग करायला हवा. संसदीय समित्यांच्या कामातील सुसूत्रता आणि व्यापकता आणखी वाढवायला हवी. PSR या राजकारणाविषयक संशोधन करणाऱ्या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार, संसदेच्या एका मिनिटाच्या कामकाजासाठी सरासरी ५०,००० रुपये खर्च होतात. त्यामुळे सदस्यांच्या गोंधळामुळे एक अधिवेशन पूर्ण वाया जात असेल तर सामान्य जनतेच्या करातून जवळपास १०० कोटी रुपये वाया जातात. विधिमंडळांचे अधिवेशन यशस्वीपणे पार पाडून जनतेच्या प्रश्नांविषयी कार्यकारी विभागाला अधिक उत्तरदायी बनविण्यासाठी, 'सदस्यांच्या एकूण मानधनातून वाया गेलेल्या वेळेचे मानधन कापून घेणे, वाया गेलेल्या वेळेची जबाबदारी न्यायालयात निश्चित करणे' असे पर्याय अवलंबता येऊ शकतात.

भारतीय कायदा आयोगाने (LAW COMMISSION) आपल्या ११६ क्रमांकाच्या अहवालात सुचविल्याप्रमाणे आरक्षणासह अखिल भारतीय न्यायिक सेवेची निर्मिती करून न्यायव्यवस्थेतील समावेशनाचा मुद्दा मार्गी लावता जाऊ शकतो. पारंपारिक न्यायव्यवस्थेतील ताण कमी करून न्यायदानाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी मध्यस्ती, समेट, लवाद, लोकअदालत तसेच पूरक न्यायिक सेवा अशा विवाद निवारणाच्या पर्यायी यंत्रणांच्या वापरावर भर देणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञानाचा (Artificial Intelligence) वापर

करत न्यायपालिका, पोलिस, वकील, न्यायवैद्यक विभाग या सर्व घटकांमधील सुसूत्रता वाढविणे गरजेचे आहे. रिक्त न्यायाधीशांची पदे भरण्याची प्रक्रिया अधिक वेगवान करण्यासाठी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग आणि राज्य न्यायिक नियुक्ती आयोगाबाबत पुन्हा एकदा विचार करणे आवश्यक आहे.

मंडल आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यापासून इतर मागास-वर्गीयांच्या राजकीय आणि सामाजिक अधिकार क्षेत्रात निश्चितच वाढ झाली आहे. याचप्रमाणे महिला आरक्षणासारख्या प्रलंबित उपायाने महिलांच्या राजकीय आणि सामाजिक समावेशनाला गती देता येऊ शकते. दारिद्र्य निर्मुलनाचे प्रयत्न, रोजगार निर्मिती कार्यक्रम, सामाजिक सुरक्षा योजना, ग्रामीण पायाभूत संरचना विकास, शिक्षणविषयक सुविधांचा विकास, सार्वजनिक आरोग्य विकास इ. प्रयत्नातून सामान्य जनतेच्या मूलभूत अधिकारांचे जतन करतानाच किमान मूलभूत सुविधांपासून कोणीही वंचित राहणार नाही याची काळजी घ्यायला हवी.

पंजाब, जम्मू-काश्मीर, ईशान्येतील काही भाग किंवा नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या भागातील फुटीरतावादी शक्तींना विकासाच्या माध्यमातून मुख्य धारेत सामावून घेतल्यास सांस्कृतिकदृष्ट्या प्रचंड विविधता असणाऱ्या आपल्या देशात राष्ट्र ही संकल्पना अधिक व्यापक होऊ शकते. नागालँडचे 'गवर्नर' असताना श्री. आर. एन. रवी यांनी शासन आणि नागालँड मधील फुटीरतावादी गट यांच्यातील शांती करारासाठी केलेल्या प्रयत्नांना बऱ्यापैकी यश मिळाले आहे. याच पद्धतीने फुटीरतावादाची शक्यता असणाऱ्या इतर भागातही राज्याच्या प्रमुखपदी अशा 'डिप्लोमॅट' लोकांची नेमणूक करून तेथे शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो.

मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने देशातील नागरिकांनी मूलभूत अधिकारांची अपेक्षा करतानाच मूलभूत कर्तव्यांचे पालन करणेही आवश्यक आहे. या एका उपायातून बहुतांश समस्या सुटणार आहेत. दररोज शाळेत प्रार्थनेच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या प्रतिज्ञेत "मी मूलभूत अधिकारांचा वापर आणि मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्यास कटिबद्ध राहीन" या एका ओळीचा समावेश करून मूलभूत अधिकार/

कर्तव्ये लहानपणापासूनच विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविली जाऊ शकतात. शासनानेही "लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे, सामूहिक हिताला उपकारक होईल अशा रितीने समाजाच्या भौतिक साधन-संपत्तीची विभागणी करणे, समान न्याय व कायदेविषयक मोफत सहाय्य पुरविणे, कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती निर्माण करणे, SC-ST-OBC यांचे शैक्षणिक अन आर्थिक हितसंवर्धन, नागरिकांचे पोषणमान आणि राहणीमान सुधरविण्यासाठी प्रयत्न करणे" ही राज्य धोरणाची गांधीवादी मार्गदर्शक तत्वे व्यापकपणे अमलात आणून सामाजिक न्यायाची प्रणाली अधिक मजबूत करायला हवी.

या विषयाच्या निष्कर्षाकडे जाताना राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले विधान अत्यंत महत्वाचे आहे. ते म्हणतात, "HOWEVER GOOD CONSTITUTION MAY BE, IF THOSE WHO ARE IMPLEMENTING IT ARE NOT GOOD, IT WILL PROVE TO BE BAD. HOWEVER BAD A CONSTITUTION MAY BE, IF THOSE IMPLEMENTING IT ARE GOOD, IT WILL PROVE TO BE GOOD." याचा सरळ अर्थ असा होतो की, संविधानाप्रती निष्ठा ठेवण्यात जनता व राज्यकर्ते किती प्रामाणिक राहतात यावरच संविधान यशस्वी किंवा अयशस्वी होण्याचे अवलंबून असते. आपल्या संविधानाच्या ७२ वर्षांच्या इतिहासात काही नकारात्मक घटनांसह संविधानाच्या यशस्वीतेची यादी फारच मोठी आहे. प्रचलित संघराज्य व्यवस्था म्हणून भारताच्या लोकशाही पाया सुदृढ झाला आहे. ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्ती कायद्यामुळे लोकशाही विचार विनिमयाची बैठक व्यापक झाली आहे. सार्वत्रिक निवडणुका नियमितपणे होतत्या जात आहेत. संसद आणि विधिमंडळे सामाजिक संरचनेचा विचार करता अधिक प्रातिनिधिक झाली आहेत.

आपल्या शेजारील म्यॅनमार, श्रीलंका, मालदिव आणि पाकिस्तान या देशांशी तुलना करता विविध निवडणुकीत दर पाच वर्षांनी नागरिकांनी मतदानाच्या रुपाने लोकशाहीवर दाखवलेला विश्वास आणि निवडणुकीच्या

निकालाप्रमाणे झालेले सत्तेचे हस्तांतरण हे आपल्या संविधानाचे सर्वात मोठे यश आहे. संविधान लागू होताना आपल्या देशासह पाश्चिमात्य विचारवंतांनी संविधानाच्या यशस्वीतेवर घेतलेल्या आक्षेपाला संविधानानेच दिलेले हे उत्तर आहे. म्हणूनच संविधान लागू झाल्यापासून एक इंच सीमाभागही भारतापासून वेगळा झाला नाही. उलटपक्षी दीव दमन, दादरा नगर हवेली, पुदुच्चेरी, गोवा, सिक्किम हे नवीन भाग भारताला जोडले गेले.

प्रसिद्ध व्यंगचित्रकार पोंगो यांनी म्हटल्याप्रमाणे, "लोकशाहीच्या बुरुजाला बाहेरुन कोणी हल्ला करत नाही तर तो आतूनच पोखरला जातो". या वाक्याप्रमाणेच आपल्या संविधानाला देखील बाहेरुन कोणी आव्हान देत नाही तर आपणच त्याची अवहेलना किंवा संवर्धन करु शकतो. त्यामुळे संविधानाचे रक्षण करण्याची प्राथमिक जबाबदारी एक नागरिक म्हणून आपलीच आहे. "संविधान रक्षती रक्षिता" या उक्तीनुसार संविधानाचे आपण रक्षण केले तरच तो आपले रक्षण करु शकेल. नाहीतर ही आव्हानांची मालिका एका मर्यादेबाहेर गेल्यास ती मागील ७२ वर्षातील लोकशाहीच्या यशस्वीतेच्या अंताचा आरंभ असेल एवढे नक्की....!!!

(मराठी आणि इंग्रजी शब्दांची एकूण संख्या - २४८९)